निशाणी क्र.७४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.७ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सुरेश तोलाजी वैरागर,

वय – ४० वर्षे, व्यवसाय– मजूरी,

राहणार – सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरू–**

१. दि.०३.०७.२०१३ रोजी मी कामाला जात असतांना पोलीसांनी मला सोनई पोलीस ठाण्यात पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तेथे तीन इसम हजर होते. त्यापैकी दोघांची नावे भाउराव जरे व किसन जरे अशी होती. पोलीसांनी भाउराव याच्याकडून कु–हाड व इतर दोघांकडून गज जप्त केले. त्यानंतर पोलीसांनी पंचनामा तयार करून त्यावर माझी सही घेतली. आता मला निशाणी ६३ वरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. आता मला आर्टीकल अ व ब वरील दोन लोखंडी गज व कु–हाड दाखविण्यात आली. ते आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेले आहेत.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे ॲड. श्रीमती व्ही. एन. जोशी यांच्यामार्फत सुरु.**

२. या खटल्यामध्ये मला यापुर्वी दोन ते तीन वेळा समन्स बजावणी झाली होती. तेव्हा मी बाहेरगावी असल्यामुळे न्यायालयात आलो नाही. त्यावेळी मी समन्सवर मी बाहेरगावी जात असल्यामुळे तारखेस न्यायालयात हजर राहू शकणार नाही असे लिहून दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांचा नेहमीचा पंच असल्यामुळे कायम न्यायालयात हजर असतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सोनई पोलीस ठाणे येथे साफसफाईचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, सोनई पोलीस ठाण्याच्या ब–याच पंचनाम्यावर माझ्या सहया असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथेवर खोटे सांगत आहे की,

माझ्या ब–याच पंचनाम्यावर सहया नसतात.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दिनांक ०३.०७.२०१३ रोजी माझ्यासमक्ष हत्यार जमा केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व माझे मैत्रीचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दोन ते तीन तारखेपासून मी फिर्यादीसोबत न्यायालयात येतो. हे म्हणणे खरे नाही की, हत्यारे फिर्यादीनेच पोलीसांकडे जमा केली. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी पोलीस ठाण्यात बोलावले व तेथे हजर असलेल्या इसमांची नावे भाउराव, किसन होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, भाउराव याचेकडून कु–हाड व इतर दोघांकडून गज जप्त केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा तयार केला व त्यावर मी सहया केल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या ताब्यातून आर्टीकल अ व ब जप्त केल हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, संबंधीत वेळेत आरोपींना अटक केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी को–या कागदावर सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कधीही व माझ्यासमक्ष पोलीसांकडे हत्यारे जमा केली नाहीत.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा

दिनांक–२७/०६/२०२५.